# महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108

अंतीम परिक्षा

पेपर क्र. IV

विषय - विशेष आणि स्थानिक कायदे

**Special & Local Laws**

सोमवार - 26/08/2013

वेळ - 10.30 ते 13.30

गुण - 100

********************************************************************

**सुचना-** अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.

ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there- against.

क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.

ड. फक्त निळया/काळया बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

इ. मुख्य उत्तरपत्रिकेतील पृष्ट क्र.2 वर काहीही लिहू नये -- Do not write anything on page 2 of main answer sheet.

********************************************************************

गुण / Marks

**प्र.क्र. 1** खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (20)

- मुंबई सेंट्रल येथील व्यापारी श्री. महेंद्र आवारे हे दुकानात बसले असतांना त्यांच्या परीचयाचा त्या भागातील गुंड विकास परीहार याने दिनांक 28/03/2013 रोजी त्यांना दुकाना बाहेर बोलावून रिक्षा जवळ घेवून गेले. त्या रिक्षात परीहारचे इतर चार साथीदार बसलेले होते. विकास परिहार याने व्यापारी महेंद्र आवारे यांना सांगीतले की, मला तुम्हाला संपविण्याची सुपारी मिळाली आहे, आता तुम्ही आमचे बरोबर चला. असे म्हणून स्वतः जवळील चॉपरचा धाक दाखवून त्यांना त्याच रिक्षातुन अज्ञात स्थळी घेवून गेले. परिहार याने आवारे यांना सांगीतले जर तुम्ही मला चार लाख रूपये दिले तर मी तुम्हाला मारणार नाही. तुमचा जीव वाचवायचा असेल तर मला लगेच चार लाख रूपये द्या, अशी मागणी करून महेंद्र आवारे यास मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.
- त्यावर आवारे हा चार लाख रूपये देण्यास कबुल झाल्याने विकास परिहारने स्वतःचे एका साथीदारास व्यापा—या सोबत व्यापा—याच्या घरी पैसे आणण्यास पाठविले. सदर बाबत भितीमुळे कोणीतीही वाच्यता कुटुंबीयांसोबत न करता चार लाख रूपये व्यापा—याने विकास परिहार यास घरून आणून दिले. विकासच्या धमकीमुळे सदर घटने बाबत आवारे यांनी कोणालाही सांगीतले नाही. परंतु दोन तीन दिवसांनंतर मारहाणी मुळे महेंद्र आवारे यांच्या छातीमध्ये दुखु लागल्याने ते उपचारासाठी दवाखान्यात गेले. उपचारादरम्यान त्याच दवाखान्यात उपचार घेणारा व्यक्ती नामे सुरेश माधवन याला सुध्दा विकास व त्याच्या साथीदारांनी याच पध्दतीने मारून त्याच्या कडुन पाच लाख रूपये घेतल्याचे व्यापारी महेंद्र आवारे यांना समजले. त्या नंतर व्यापारी महेंद्र आवारे यांनी जवळच्या पोलीस स्टेशनला नगुद घटने बाबत तकार दिल्याने गुन्हा दाखल झाला.
- सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान सुरेश माधवन यांना सुध्दा विकास व त्याच्या साथीदारांनी मारहाण करून पाच लाख रूपयांची खंडणी वसुल केल्याचे निष्पन्न झाले. गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीती वरून रिक्षा चालक संदीप जाधव यास तपासादरम्यान ताब्यात घेतले. त्याचे कडे विचारपूस केली असता विकास याने मोबाईल वरून संदीप जाधव यास रिक्षा सह बोलावल्याचे समजले. पुढील तपासात विकास परिहार, व त्याचे साथीदार प्रदीप सावकार, नामदेव दराडे, सोमनाथ राघवन यांनी मिळून वरील दोन्ही व्यक्तींना मारहाण करून व धमकी देवून त्यांचे कडुन खंडणी घेतल्याचे निष्पन्न झाले.
- तपासादरम्याण विकास परिहार, संदीप जाधव, प्रदीप सावकार, नामदेव दराडे, सोमनाथ राघवन यांचेवर दाखल गुन्हयांची माहीती प्राप्त करण्यात आली. मागील दहा वर्षात प्रत्येक आरोपीवर चार संयुक्तरित्या दखलपात्र गुन्हे वेगवेगळया पोलीस ठाण्यात दाखल आहेत. हे गुन्हे जबरीचोरी, दरोडा, अपहरण, जबर दुखापत इत्यादी स्वरूपाचे होते. त्या गुन्हयात दोषारोप पत्रे पाठविण्यात आली असुन न्यायालयाने त्याची दखल घेतलेली आहे. फिर्यादी महेंद्र आवारे यांच्या गुन्हयात तपासादरम्याण मा. न्यायालयास अहवाल पाठवुन MCOCA चे वाढीव कलम लावल्या बाबत कळविण्यात आले. आवश्यक सर्व पुर्तता करून आरोपीतांविरूध्द दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

**प्र. 1.1** फिर्यादी महेंद्र आवारे यांने पोलीस स्टेशनला दिलेल्या तकारीवरून (**SLL** वगळता) कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करता येईल ? [2]

**प्र. 1.2** आरोपीतांचा पुर्व इतिहास व त्यांचेवर दाखल गुन्हयांचे रेकॉर्ड मिळाल्यानंतर प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 1999 नुसार वाढीव कलमे लावता येतील काय? कोणती कलमे लावता येतील ? *(30 शब्द)* [2]

**प्र. 1.3** गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 1999 ची कलमे लावतांना कोणत्या दर्जाच्या वरिष्ठ पोलीस अधिका—याची पुर्व परवानगी कोणत्या कलमानुसार घेणे आवश्यक आहे. ? [1]

**प्र. 1.4** गुन्हयाचा तपास कोणत्या दर्जाच्या पोलीस अधिका—याने करणे आवश्यक आहे ? कोणत्या कलमान्वये ? *(20 शब्द)* [1]

**प्र. 1.5** गुन्हयाचे दोषारोप पाठवितांना कोणत्या दर्जाच्या पोलीस अधिका—यांची परवानगी घेतली पाहीजे ? कोणत्या कलमान्वये ? *(50 शब्द)* [4]

**प्र. 1.6** सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र कोणत्या न्यायालयात पाठविले पाहीजे? कोणत्या कलमान्वये? *(30 शब्द)* [2]



7

प्र. 1.7 महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 1999 नुसार तपासादरम्यान पोलीस अधिका–या समोर आरोपीचा कबुली जबाब घेता येईल काय ? असल्यास कोणत्या कलमानुसार कोणत्या दर्जाच्या पोलीस अधिका–या समोर कबुली जबाब घेता येईल ? *(30 शब्द)* [2]

प्र. 1.8 MCOCA, 1999 कायद्यातील तरतुदी नुसार आरोपीतांचा कबुली जबाब घेण्याची कियारीती स्पष्ट करा? *(60 शब्द)* [3]

प्र. 1.9 MCOCA, 1999 नुसार या गुन्हयातील आरोपीतांच्या मालमत्तेच्या समपहरणची कीयारीती स्पष्ट करा? *(60 शब्द )* [3]

प्र. 2 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. ( उत्तरे प्रत्येकी 40 शब्द – प्रत्येकी 2 गुण ) (10)

➢ पोलीस ठाणे साऊगाव येथील पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, रामनाथ थोरात याचे घराचे मागील बाजुच्या खोलीमध्ये गावातील काही लोक 52 पत्त्यावर जुगाराचा खेळ खेळत आहेत. त्या नुसार पो. नि. पाटील यांनी कर्मचा–या मार्फत दोन प्रतिष्ठीत इसमांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले. त्यांना विचारले की आम्हास जुगार अड्डयावर छापा टाकायचा आहे, तुम्ही पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? सदर लोकांनी संमती दर्शविल्या नंतर पोलीस पथक छापा टाकण्यासाठी रवाना झाले.

➢ घटनास्थळी पोहोचल्या नंतर छापा पथकातील इतर कर्मचारी आजुबाजुला थांबले. एका पंचाने पुढे जावुन पाहीले असता रामनाथ थोरात यांचे घराचे मागील बाजुच्या खोली मध्ये जुगार चालू होता. सदर पंचाने जुगार चालू असल्याबाबत कळविल्या वरून छापा पथकाने सदर जागेवर छापा टाकला. जुगार खेळत असलेले इसम 52 पत्त्यांवर पैसे लावून जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांना साहीत्यासह ताब्यात घेण्यात आले. घटना स्थळी पंचनामा करण्यात आला. छापा टाकणे कामी हजर असलेले छापा पथकातील पोलीस निरीक्षक श्री पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली. पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करून तपासाअंती दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले.

प्र. 2.1 सदर प्रकरणी कोणत्या कायद्या व कलमान्वये गुन्हा दाखल करणे आवश्यक राहील ? [2]

प्र. 2.2 या प्रकरणात पुराव्याच्या दृष्टीने कोणते साहीत्य पंचनामा करून जप्त करणे आवश्यक आहे ? [2]

प्र. 2.3 प्रस्तुत गुन्हा हा जामिनकीचा अगर बिगर जामिनकीचा आहे ? कोणत्या तरतुदी नुसार ? [2]

प्र. 2.4 या केसमध्ये छापा टाकण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिका–याची परवानगी किंवा त्यांची उपस्थीती आवश्यक आहेकाय? [2]

प्र. 2.5 घटनास्थळाचा मालकी हक्क सिध्द करण्याकरीता कोणकोणती कागदपत्रे पुरावा म्हणून जप्त करणे आवश्यक आहे ? [2]

प्र.क्र. 3 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. ( प्रत्येकी 40 शब्द – प्रत्येकी 2 गुण ) (10)

➢ पो. शि. मिलींद निकम पोहेगाव पोलीस ठाणे येथे नेमणूकीस होता. तो दिनांक 01/08/2013 रोजी 20:00 वाजे पासून ते दिनांक 02/08/2013 रोजीचे सकाळी 08:00 वाजे पावेतो कर्तव्यावर हजर असतांना दिनांक 01/08/2013 रोजी 23.00 वाजेच्या सुमारास पोलीस स्टेशनच्या बाहेर एक इसम जोरजोरात मोठमोठयाने बोलत होता. तसेच शिवीगाळ करत होता. पो. शि. निकम व कर्तव्यावर हजर असलेले दोन कर्मचा–यांनी पोलीस स्टेशनच्या बाहेर सदर इसमाच्या जवळ जावून चौकशी केली. त्यास त्याचे नावगाव विचारले. त्याने नाना कुशारे असे नाव सांगीतले. त्याचे जवळ जावून पाहता त्याचे तोंडाचा आंबट व उग्र वास येत होता. म्हणुन पो. शि. मिलींद निकम याने त्यास पोलीस स्टेशन मध्ये आणून ठाणे अंमलदार तात्या सरोदे यांचे समोर पेश केले. ठाणे अंमलदार यांनी त्याची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत फर्मावीले वरून पो. शि. निकम याने सदर इसमास जिल्हा रूग्णालयात आणले. निवासी वैद्यकीय अधिकारी यांनी सदरहु इसमाची तपासणी करून त्याचे रक्त व लघवीचे नमुने घेतले. त्यांनी सदर इसम मद्यार्काच्या अंमलाखाली असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. त्या नंतर सदरहु इसमास पुन्हा पोलीस ठाण्यात आणून पो. शि. निकम यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवून पोहेगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. 3152/2013 असा गुन्हा दाखल केला.

प्र. 3.1 फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी नुसार कोणत्या अधिनियमाच्या कोणत्या तरतुदी लागु होतील ? [2]

प्र. 3.2 प्रस्तुत गुन्हयाच्या तपासादरम्याण कोणकोणत्या बाबींचे नमुने ताब्यात घेणे आवश्यक आहे? कोणत्या तरतुदी नुसार? [2]

प्र. 3.3 प्रस्तुत गुन्हयातील मुददेमाल तपासणी साठी पाठविता येईल अगर कसे ? असल्यास कोणता मुददेमाल कोणाकडे पाठवावा ? कोणत्या तरतुदी नुसार ? [2]

प्र. 3.4 प्रस्तुत गुन्हयातील आरोपीतास वॉरन्ट शिवाय अटक करता येईल अगर कसे? असल्यास कोणत्या तरतुदी अन्वये ? [2]

प्र. 3.5 प्रस्तुत गुन्हयातील आरोपीतास न्यायालयाने सिध्दपराध ठरविल्यास त्यास कोणत्या कलमान्वये शिक्षा होवू शकते ? अधिकतम किती शिक्षा होवू शकते ? [2]

प्र.क्र. 4 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (20)

➢ दवानगर येथील महीला नामे सुंदराबाई मोहीते ही तीचा लहान भाऊ लक्ष्मण मोहीते वय – 12 याचे सोबत राहत असुन शेतमजुरी करून स्वतःचा उदरनिर्वाह करते. तिच्या घराजवळ राहणारा इसम रंगनाथ चौधरी यास ती ओळखत असुन त्यांचा परिचय आहे. दिनांक 04/06/2013 रोजी रंगनाथ चौधरी याने सुंदराबाईला अशी धमकी दिली की, *" लक्ष्मणला पळवून ठार मारेन. जर त्याला वाचवायचे असेल तर माझे सोबत लॉजवर चल "* या धमकीमुळे घाबरून जावून सुंदराबाई अनिच्छेने त्याचे सोबत सिटी टॉप लॉज येथे गेली. लॉजचे रजीस्टर मध्ये रंगनाथने स्वतःचे खरे नाव लीहीले. सुंदराबाईस स्वतःची पत्नी असल्याचे सांगून रजिस्टर वर स्वाक्षरी केली. लॉज रूममध्ये त्याने तीचे इच्छेविरूध्द तीच्याशी शरीर संबंध केले. तसेच तिला नकळत मोबाईलमध्ये त्याचे चित्रीकरण केले.

➢ त्या नंतर दोन तीन दिवसांनी त्याने सुंदराबाईस सांगीतले की, *मी आपले शरीरसंबंधाचे चित्रीकरण केले आहे. तुला पुन्हा माझे बरोबर लॉजवर यावे लागेल. नाहीतर मी हे चित्रण लोकांना दाखवून तुझी बदनामी करीन.* त्या मुळे घाबरून जावून सुंदराबाई त्याचे बरोबर पुन्हा लॉजवर गेली. रंगनाथने सुंदराबाई सोबतच्या संबंधाचे व्हिडीओ चित्रण त्याचा मित्र सोमनाथ याचे कडील संगणकाच्या सहाय्याने सिडीवर कॉपी केले. सदरची सिडी रंगनाथ याने संजय सांगळे व रामनाथ मोरे यांना पाहण्यासाठी दिली. तसेच सदर चित्रण रंगनाथने त्याचे मोबाईलवरून त्याच्या वर्धा येथील मित्रास ( उमेश यास ) मोबाईलवर MMS ने पाठविले.



P

➢ रंगनाथ याने सुंदराबाई हिला " *तु जर पोलीसांकडे तकार केली तर तुला ठार मारीन* " असा SMS पाठविला. वरील घटने बाबत सुंदराबाईने रंगनाथच्या छळास कंटाळुन तकार केली. तिच्या तकारीवरून दवानगर पोलीस ठाण्यास गुन्हा दाखल करण्यात आला.

प्र. 4.1 फिर्यादी सुंदराबाई मोहीते हीने पोलीस स्टेशनला दिलेल्या तकारी वरून कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये गुन्हा नोंदविणे आवश्यक राहील ? [3]

प्र. 4.2 पुराव्याच्या दृष्टीने या घटने संबंधीत कोणकोणते साहीत्य व साधने जप्त करणे आवश्यक आहे? *(50 शब्द)* [4]

प्र. 4.3 माहीती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 च्या तरतुदी नुसार संगणक, सिडी, मोबाईल इत्यादी जप्त करता येतील काय ? कोणत्या कलमान्वये ? पुराव्या कामी मोबाईल कंपनीकडुन काय माहीती मागवावी लागेल ? *(30 शब्द)* [2]

प्र. 4.4 वरील विविध जप्त वस्तु बाबत कोणकोणत्या तज्ञांकडुन अभिप्राय मिळविणे आवश्यक आहे ? *(40 शब्द)* [3]

प्र. 4.5 माहीती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 च्या तरतुदी नुसार सदर गुन्हयाचा तपास कोणत्या दर्जाच्या पोलीस अधिका–याने करणे आवश्यक आहे ? कोणत्या कलमानुसार ? *(30 शब्द)* [2]

प्र. 4.6 अश्लील सिडी तयार करून त्याचे वितरण करणे या करीता माहीती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कोणत्या कलमान्वये किती अधिकतम शिक्षा होवू शकते ? *(50 शब्द)* [4]

प्र. 4.7 बदनामी करणारा MMS पाठविणे बाबत माहीती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कोणत्या कलमान्वये किती अधिकतम शिक्षा होवू शकते? [2]

**प्र.क्र. 5 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.** (20)

➢ सावरपाडा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना खात्रीशीर माहीती मिळाली की सावरपाडा रोड वरील स्वर्ग मसाज पार्लर येथे मसाजच्या नावाखाली तेथील मालकीण सिमाबाई ही वेश्या व्यवसाय चालवीते. त्यावरून प्रभारी अधिकारी यांनी त्या ठिकाणी सापळा रचून छापा टाकण्याचे ठरविले. पोउनि गोरे यांचे सह एक छापा पथक बनविले व कर्मचा–यां मार्फत दोन प्रतिष्ठीत इसमांना बोलावून घेतले. सदर इसमांनी पंच म्हणून काम करण्यास होकार दिल्यानंतर त्यापैकी राजु भारतन यास बनावट गि–हाईक बनवून त्यास लॉज व मुलीचे पैसे या करीता रू 1500/– ( पाचशे रू दराच्या तीन नोटा ) देवून त्या बाबत सविस्तर पंचनामा केला.

➢ राजु भारतन ठरल्या प्रामाणे स्वर्ग मसाज पार्लर येथे गेला. तेथे त्याने पार्लर मालकीण सिमाबाई हिचे कडे मुलीं बाबत मागणी केली. सिमाबाई हीने त्याला कविता नावाच्या मुली सोबत जाण्यास सांगीतले. सिमाबाईच्या मागणी वरून राजुने सिमाबाई हिस रू 500/– दिले व सदर मुलीला घेवून तो रामराव रोडे यांच्या मालकीच्या टीप टॉप लॉजवर गेला. सदर लॉजच्या रजिस्टर मध्ये स्वतःच्या नावाची नोंद केली. कविता ही बायको असल्याचे सांगून रूम भाडयाचे रू 500/– काऊंटरवरील इसमास दिले. या ठिकाणी ठरल्या प्रमाणे दुसरा पंच थांबलेला होता. लॉजचे रूममध्ये जाताना त्याने दुस–या पंचास इशारा केला. रून मध्ये जाताच त्याने कविता हिला शरीर संबंध करणेसाठी तिच्या मागणी वरून रू 500/– दिले. दुस–या पंचाच्या इशा–या वरून लॉज बाहेर असलेल्या साधे वेशातील पोलीसांनी छापा टाकला. सदर मुलगी कविता, सिमाबाई व पंचासह पोलीस पथक पोलीस स्टेशनला आले. या प्रकरणी पोलीस उप निरीक्षक गोरे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली.

प्र. 5.1 सावरवाडा पोलीस स्टेशनला कोणत्या कायदा व कलमाखाली गुन्हा दाखल केला जाईल? *(30 शब्द)* [2]

प्र. 5.2 पुराव्याच्या दृष्टीने कोणकोणते साहीत्य व साधने पंचनामा करून जप्त करणे आवश्यक आहे ? *(50 शब्द)* [4]

प्र. 5.3 प्रस्तुत छापाकामी कोणत्या दर्जाचे पोलीस अधिकारी आवश्यक आहे ? त्या बाबतची तरतुद कोणती? *(30 शब्द)* [2]

प्र. 5.4 टिप टॉप लॉजचे मालक रामराव रोडे यांच्यावर आरोप ठेवता येईल काय ? असल्यास कोणत्या कायदया व कलमान्वये ? *(40 शब्द)* [4]

प्र. 5.5 आरोपीतांवर आरोप सिध्द झाल्यास या केसमध्ये कमीत कमी व जास्तीत जास्त कोणत्या शिक्षेची तरतुद आहे? *(30 शब्द)* [2]

प्र. 5.6 स्वर्ग पार्लरची मालकीण सिमाबाई हिच्यावर कोणत्या कलमान्वये कारवाई करता येईल? *(30 शब्द)* [2]

प्र. 5.7 प्रस्तुत घटनेतील मुलगी कविता हिचा अनैतिक देह व्यापारासाठी वापर झाला असल्यास ती आरोपी होवू शकते काय? असल्यास त्याबाबतची तरतुद काय? *(40 शब्द)* [4]

**प्र.क्र. 6 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.** (20)

प्र. 6.1 राजूकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही. हे वाहन मालकाला म्हणजे शामला माहीत आहे. तरीसुध्दा शामने राजुला वाहन चालविण्यास दिले. संबंधितांवर कोणत्या नियम व कलमांन्वये दंडनीय कारवाई होईल? *(30 शब्द)* [2]

प्र. 6.2 एखादया वाहन चालकाच्या हातुन अपघात होवून एखादया व्यक्तीला इजा पोहोचली असेल तर चालकाचे कर्तव्य काय? कोणत्या नियमान्वये? विषद करा. *(35 शब्द)* [3]

प्र. 6.3 दारू पिलेल्या व्यक्तीने किंवा औषधी द्रव्याच्या अंमल असलेल्या व्यक्तीने वाहन चालविले किंवा चालविण्याचा प्रयत्न केला व तपासणीत तो नशेच्या अंमलाखाली आढळून आला तर कोणत्या कलमान्वये शिक्षा होईल? पहिल्या अपराधासाठी काय शिक्षा आहे? पुन्हा 3 वर्षाचे आत अपराध केला तर काय शिक्षा आहे? *(35 शब्द)* [3]

प्र. 6.4 मोटार वाहन अधिनियम, 1988 च्या कोणत्या कलमांचा भंग झाल्यास वर्दी घातलेला पोलीस अधिकारी असे करणा–या व्यक्तीस विना वॉरंट अटक करू शकेल? *(30 शब्द)* [2]

प्र. 6.5 नोंदणी प्रमाणपत्र, वाहन परवाना इ दस्तऐवज जर खोटे आहेत असे तपासी अधिका–यास वाटले तर सदर दस्तऐवज पोलीस अधिकारी मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कोणत्या कलमांन्वये जप्त करू शकतो? तसेच नोंदणी प्रमाणपत्र, परवाना इ चालकाजवळ नसल्यास अशी वाहने कोणत्या कलमान्वये अडवून ठेवता येतील? *(30 शब्द)* [2]

प्र. 6.6 ट्रक चालक एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी प्राण्यांची वाहतूक करीत असेल तर त्याने त्याबाबत काय खबरदारी घ्यावी, याबाबत महाराष्ट्र मोटार वाहन रूल्स मध्ये कोणत्या तरतुदी आहेत? *(40 शब्द)* [3]

प्र. 6.7 ट्रेलरचा वापर करण्यासंदर्भात आवश्यक अटी स्पष्ट करा? महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम, 1989 च्या कोणत्या नियमात या अटी नमूद आहेत? *(40 शब्द)* [3]

प्र. 6.8 टॅक्सी मीटर तपासण्याचे अधिकार कोणास आहे? कोणत्या कलमान्वये –स्पष्ट करा. *(20 शब्द)* [2]